# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/06/2023 (गुरूवार) सकाळ

---

## मौदा पोलीसांची महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या अवैध सुगंधी तंबाखुची गाडीतुन वाहतुक करणाऱ्या इसमावर कारवाई

मा. पोलीस अधीक्षक सा. व अपर पोलीस अधीक्षक सा. नागपूर ग्रामीण यांनी नागपूर जिल्हयात अवैध धंदयावर कारवाई करून अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेश दिले आहेत त्याप्रमाणे यांचे मार्गदर्शनाखाली अवैध धंदयावर कारवाई करीत असतांना दिनांक १४/०६/२०२३ रोजी १९.३० वा. ते २०.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस स्टाफ यांना पेट्रोलिंग दरम्यान मुखबिरकडुन गुप्त माहिती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या अवैध सुगंधी तंबाखुची मौजा माथणी शिवार सुर्या बार समोर ता. मौदा येथे अवैध सुगंधी तंबाखुची कार व्दारे वाहतुक होत आहे. त्यानुसार मौजा माथणी शिवार सुर्या बार समोर ता. मौदा येथे नाकाबंदी करून यातील आरोपी ओमनी कार क्र. एम.एच.– ४० बि ई –५८५६ फरार वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या तसेच मानवी जीवीतास हानीकारक असलेल्या वेगवेगळया कंपनीचा ३४ किलो सुगंधित तंबाखुची वाहतुक करीत असतांनी पोलीसांना पाहुन सुगंधित तंबाखु वाहनासह घटनास्थळी सोडुन पळुन गेला. घटनास्थळी ३४ किलो सुगंधित तंबाखु किंमती अंदाजे ३१,१९०/–रु. व ओमनी कार क्र. एम.एच.–४० बि. ई–५८५६ किंमती अंदाजे २,००,०००/–रु असा एकुण २,३१,१९०/–रुपयाचा मुद्देमाल मोक्यावर जप्त केला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस नायक दिपक दरोडे पास्टे मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १८८, २७२, २७३, ३२८ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनेकर मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १० कि. मी अंतरावर मौजा नंदापुरी येथे दिनांक १४/०६/२०२३ चे १४.१५ वा. ते १४. ३० वा. चे दरम्यान यातील फिर्यादी नामे– नंदा रामेश्वर मदनकर वय ४५ वर्ष, रा. नंदापुरी ता. मौदा जि. नागपूर व **आरोपी नामे– सुधाकर घुसाराम मदनकर, रा. नंदापुरी ता. मौदा जि. नागपूर** हे नातेवाईक असुन एकाच गावात राहतात. दिनांक १४/०६/२०२३ रोजीचे दुपारी ०२/१५ वा. आरोपी सुधाकर मदनकर यांनी त्यांच्या ताब्यातील ट्रॅक्टर फिर्यादीचे पती रामेश्वर मदनकर यांच्या अंगावर आणुन त्यांना धडक देवुन अंगावर नेवुन उद्देषपुर्वक जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी ही तिच्या पतीकडे धावत गेली असता फिर्यादीला सुध्दा आरोपीने ट्रॅक्टरने जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम ३०७, ३२४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के पोलीस स्टेशन रामटेक मो. नं. ९४०५९०३५२८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर